# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महोदय/महोदया,**

शासकीस कामकाजामध्ये प्रतिज्ञापत्र लेखास मुद्रांक शुल्क माफ करणेबाबतचे सह जिल्हा निबंधक वर्ग-१ जिल्हाधिकारी सांगली यांचे संदर्भ क्र. सजिनीसां/प्रतिज्ञापत्र/मु.शु. माफी/४११७/२०२० दि.२२/१०/२०२० रोजीचे पत्र सोबत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत प्रमाणे पाठविण्यात येत आहे.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत - वरील प्रमाणे

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 562
दिनांक- 02 NOV 2020
E:\Sm\Circular\Circular 2019.docx

**सह जिल्हा निबंधक वर्ग-1 व मुद्रांक जिल्हाधिकारी सांगली यांचे कार्यालय,**

**राजवाडा कंपौड,सांगली.**

फोन नं.०२३३-२३७६१३६.                email- jdr.sangli.igrm@nic.in


---

जा.क्र./सजिनीसां/प्रतिज्ञापत्र/मु.शु.माफी/.8996 /२०२०                दिनांक 22/१०/२०२०.

प्रति,

मा.कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
विद्यानगर,कोल्हापूर,
पिन- 416004


SHIVAJI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
Date 27 OCT 2020
Inward No. 873
To Whom Alli T-2


**विषय :- शासकिय कामकाजामध्ये प्रतिज्ञापत्र लेखास मुद्रांक शुल्क माफ करणेबाबत.**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन राजपत्र अशा.क्र.154 रजिस्टर्ड नं. टीईसीएच/47-303/ एमबीआय/2003-05 दिनांक-01 जुलै 2004.


Shivaji University, Kolhapur
Pro-Vice-Chancellor Office
Date :- 27 OCT 2020
Inward No :- 388
To Whom :- Alli-T-2


उपरोक्त विषयाबाबत कळविणेत येते की, शासकिय कामकाजामध्ये काही प्रकरणांमध्ये प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. त्यासाठी पुर्वी रू.100/- इतके मुद्रांक शुल्क घेणेत येत होते. तथापि उक्त संदर्भिय शासन अधिसूचना अन्वये जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, वास्तव्य प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तसेच शासकिय कार्यालये व न्यायालये यांचेसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुसूची 01 मधील अनुच्छेद 4 अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ केलेले आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविणेत येते की, **शाळा / महाविद्यालये यांचेकडे विद्यार्थ्यांकडून दाखल करावयाच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांवर रू.100/- चे मुद्रांक शुल्क लावणेचा आग्रह धरू नये.तसेच याबाबत आपले आस्थापनेवरील सर्व शाळा / महाविद्यालये यांना याबाबत आपले स्तरावरून सुचना देणेत याव्यात.**

**सोबत - उक्त संदर्भिय शासन अधिसूचनेची प्रत.**

आपला विश्वासू,

(सा.ना.दुतोंडे) 22/10/2020
मुद्रांक जिल्हाधिकारी
सांगली.

अप्रा. क्र. १५४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जुलै १, २००४/आषाढ १०, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जुलै २००४

आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००४/१६३६/प्र. क्र. ४३६/म-१.---मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी खात्री पटल्यामुळे महाराष्ट्र शासन याद्वारे जात प्रमाणपत्र/उत्पन्न प्रमाणपत्र/वास्तव्य प्रमाणपत्र/राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तसेच शासकीय कार्यालये व न्यायालये यांचेसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर, उक्त अधिनियमाच्या अनुसूची १ मधील अनुच्छेद ४ अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

भा. सु. तायडे,
शासनाचे अवर सचिव.